# पिंपरी चिंचवड महानगरपालिका,पिंपरी, पुणे -411 018.
## करआकारणी व करसंकलन विभाग

दुरध्वनी क्रमांक: 020-67331504 फॅक्स क्रमांक:27425600 E-mail : ptax@pcmcindia.gov.in

020-67331506 67331545 Website :www.pcmcindia.gov.in


जावक क्रमांक :कर/मुख्य/९/कावि/२२२ /२०२० दिनांक : २९ /०९/२०२०

**विषय - मिळकतकर सवलतीचा लाभ देणेबाबत....**

**परिपत्रक,**

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या करसंकलन विभागाकडून मिळकतधारकांना विविध करसवलती देणेत आलेल्या आहेत.या सवलतीमध्ये ऑनलाइन मिळकतकर भरणा केलेस द्यावयाच्या विविध सवलतींचाही समावेश आहे.

पिंपरी चिंचवड महानगरपालिका क्षेत्रात निवासी,औद्योगिक,बिगरनिवासी व मिश्र स्वरूपाच्या मिळकती असून मिळकतकराची रक्कम रोख अथवा चेकद्वारे भरण्याऐवजी ऑनलाइन (Online banking,NFTR,RTGS,Credit/Debit card ete) जमा करण्याकडे या मिळकतधारकांचा कल दिसून येत आहे.तसेच लोकअदालतीमध्येही मिळकतधारक एकापेक्षा जास्त टप्यामध्ये मिळकतकर (ऑनलाइन सह चेक,डी.डी. अथवा रोख इत्यादी द्वारे )जमा करून घेण्याची विनंती करीत असतात.

उपरोक्त नमूद केलेनुसार मिळकतधारक एकाच मिळकतकराची मोठी रक्कम ऑनलाइन जमा करीत असताना Credit / Debit card च्या एकाच वेळी रक्कम काढण्याच्या मर्यादेमुळे मिळकतकराची संपूर्ण रक्कम एकरकमी जमा होत नाही.परिणामी मिळकतधारक एका पेक्षा जास्त वेळ Credit/Debit card द्वारे मिळकतकर भरणा करतात तथापि सदर रक्कम एकाच वेळी जमा न होता टप्याटप्याने जमा होत असलेने संबधित मिळकतधारकास ऑनलाइन देय सवलतीचा लाभ मिळत नाही व मिळकतधारक याबाबत तक्रार करून सवलत देणेबाबत विनंती करीत असत्तात. मागील २ वर्षाच्या लोकअदालत तसेच देय सवलतीच्या कालावधीत वरीलप्रमाणे तक्रारी प्राप्त झालेल्या आहेत.प्राप्त तक्रारींमध्ये तथ्यांश असलेची बाब विचारात घेता प्रकरणी खालील नमूद प्रमाणे कार्यवाही करणेस मान्यता देणेत येत आहे.

1. मिळकतधारक एकच मिळकतकराची रक्कम ऑनलाइन जमा करीत असताना <u>एकाच **दिवशी अथवा सलग दोन दिवसांमध्ये ठराविक** कालावधीत,</u>एकापेक्षा जास्त ऑनलाइन (Online banking,NFTR,RTGS,Credit/Debit card ete) द्वारे मिळकतकर भरणा करतील तसेच भरणा रक्कम एकाच वेळी जमा न होता टप्याटप्याने जमा होत असेल तर सदर मिळकतकर भरणा एकाच वेळी भरणा केलेचे ग्राह्य धरले जावे.

(कृ.मा.पहा.).....

2. उपरोक्त १ नुसार कार्यवाही झालेस एकरकमी भरणा न झालेने मिळणाऱ्या संभाव्य मिळकतकर सवलतीचा लाभ संबधित मिळकतधारकास देणेबाबत कार्यवाही करणेत यावी.
3. उपरोक्त १ नुसार भरणा केलेनंतर बिल/ संगणक प्रणाली मध्ये(फक्त) देय सवलतीमुळे आढळून येणारी प्रलंबित व थकबाकी रक्कम कमी अथवा शून्य करणेस मान्यता असावी.
4. लोकअदालतीमध्ये मा न्यायाधीश यांचे मंजूर आदेशानुसार (AWARD) दोन किंवा त्यापेक्षा जास्त टप्प्यामध्ये मिळकतकर भरणेस परवानगी दिलेस उक्त मुद्दा क्रमांक 1 ते 3 नुसार कार्यवाही करणेस मान्यता असावी.
5. महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम प्रकरण ८ ,नियम ४१ अन्वये मनपा कर शास्तीच्या देय सवलती प्रकरणी उक्त मुद्दा क्रमांक १ ते ३ नुसार कार्यवाही झालेस मनपा कर शास्ती सवलतीचा लाभ मिळकतधारकास देणेत यावा.
6. अशा प्रकारे येणाऱ्या तक्रारी/ विनंती अर्ज विभागीय कार्यालय स्तरावरून सक्षम कागदपत्रांसह छाननी करून प्रस्तावित करणेत याव्यात.मा आयुक्त सो यांचेकडून प्रदान करणेत अधिकार मर्यादेनुसार नस्ती अंतिम मंजुरीकामी सहाय्यक आयुक्त,करसंकलन यांचेकडे सादर करणेत याव्यात.
7. उपरोक्त प्रकरणी करावयाची कार्यवाही ही यापूर्वीच्या लोकअदालतीमध्ये प्राप्त (AWARD) आदेश तसेच माहे एप्रिल २०२० पासून प्राप्त सर्व ऑनलाइन व्यवहार,अभय योजना,लोकअदालत अर्ज/प्रकरणाच्या बाबतीत लागु राहील.

प्रस्तुत परिपत्रकाची अंमलबजावणी तातडीने करणेत येऊन विषयांकित प्रकरणी उपरोक्त नमूद केलेनुसार नियमाधीन कार्यवाही करणेत यावी.

(श्रावण हर्डीकर)
**आयुक्त**
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी – ४११ ०१८

**प्रति,**
क्षेत्रीय अधिकारी/ प्रशासन अधिकारी
सर्व क्षेत्रीय कार्यालय

**प्रत -**
१.सर्व करसंकलन विभागीय कार्यालय
२/- माहिती व कार्यवाहीस्तव सादर.....

२.माहिती व तंत्रज्ञान विभाग / प्रॉबिटी सॉफ्ट प्रा.लि., / बिल क्लाऊड

३/- उक्त परिपत्रकातील नमूद सक्षम अधिकाऱ्यांच्या स्वाक्षरीने प्राप्त आदेशानुसारच प्रकरणी कार्यवाही करणेत यावी.